**आकाशवाणी मुंबई**

**राष्ट्रीय बातम्या देत आहे.**

**<u>ठळक बातम्या</u>**

- 'सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक सुधारणा विधेयका' वर राष्ट्रपतींची स्वाक्षरी
- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आंध्रप्रदेशात भोगपुरम विमानतळाचं उद्घाटन
- व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतीत १९२ रुपये कपात
- लोकमान्य टिळक स्मृती पुरस्कार राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोभाल यांना प्रदान

**आणि**

- तैपेई बॅडमिंटन स्पर्धेत भारताची तन्वी शर्मा अंतिम फेरीत दाखल

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 'सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक सुधारणा विधेयका'वर स्वाक्षरी केली आहे. स्पर्धात्मक परीक्षांमधे गैरप्रकार रोखून परीक्षा प्रक्रीयेत पारदर्शकता आणणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या नवीन कायद्यात दोषींना १० वर्षांपर्यंतची कैद, १० कोटी रुपयांपर्यंतचा दंड आणि मालमत्ता जप्ती यांसारख्या कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात विशेष जलदगती न्यायालयं स्थापन केली जातील. पोलिसांना एफआयआर नोंदवल्यापासून दोन महिन्यांत तपास पूर्ण करावा लागेल, तर आरोपपत्र दाखल झाल्यापासून तीन महिन्यांत खटल्याचा निकाल देणं बंधनकारक असेल.

**<><><><>**

आंध्रप्रदेशात भोगापुरम इथं अल्लुरी सीताराम राजू आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. नागरी हवाई वाहतूक मंत्री किंजारिपु राममोहन नायडू, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

५ हजार कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या विमानतळावरुन येत्या १७ ऑगस्टपासून विमानवाहतूक सुरु होईल.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १८ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि पायाभरणी या कार्यक्रमात झाली.

कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं भव्य स्वागत करण्यात आलं. आंध्रप्रदेशातल्या आदिवासी महिलांचं पारंपरिक धेमसा नृत्य यावेळी सादर करण्यात आलं. विक्रमी संख्येने त्यात महिला सहभागी झाल्या होत्या.

आंध्रप्रदेशचा दौरा आटोपून प्रधानमंत्री कर्नाटकात जाणार आहेत.

**<><><><><>**

तेल विक्री कंपन्यांनी व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतीत १९२ रुपये कपात केली असून नवे दर आजपासून लागू होणार आहेत. यानुसार दिल्लीत १९ किलो वजनाच्या व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरची किंमत २ हजार ७३८ रुपये, कोलकाता मध्ये २ हजार ८७२ रुपये, मुंबईत २ हजार ६९० रुपये तर चेन्नईत २ हजार ९०६ रुपये इतकी झाली आहे. यामुळे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, ढाबे आणि खाद्यपदार्थांशी संबंधित व्यवसायांना काहीसा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

५ किलो वजनाच्या छोटू सिलिंडरचे दरही ८०८ रुपये ५० वरुन कमीकरुन प्रतिसिलिंडर ७६२ रुपये केले आहेत. विमानासाठीच्या इंधनाचे दर वाढवून प्रतिलीटर ११५ रुपये केले आहेत.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर संकलनात जुलै महिन्यात १५ पूर्णांक ४ शतांश टक्के भर पडली असून ते २ लाख११हजार कोटी रुपयांच्या वर पोहोचलं आहे. गेल्या वर्षीच्या जुलैमधे एकूण जीएसटी संकलन १ लाख ८३ हजार कोटी रुपये झालं होतं. यंदाच्या संकलनात महिन्यात केंद्रीय वस्तू आणि सेवा कर महसूल ३९ हजार ८३५ कोटी रुपये होता, तर राज्य वस्तू आणि सेवा करापोटी ४७ हजार ८८१ कोटी रुपये जमा झाले. एकात्मिक जीएसटी संकलन १ लाख २३ हजार कोटी रुपयांहून अधिक झालं. जुलै महिन्यात एकूण परताव्याची रक्कम १३ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढली, आणि २९ हजार ९६८ कोटी रुपये झाली. परताव्याची

रक्कम वजा केल्यानंतर, निव्वळ जीएसटी महसूल १ लाख ८१हजार कोटी रुपयांच्या वर गेला.

<><><><><>

२०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जुलै अखेरपर्यंत जवळपास ६ लाख प्राप्तिकर परतावे भरल्याची माहिती प्राप्तीकर विभागानं दिली आहे. दंड आणि व्याज लागू न होता परतावे भरायची ३१ जुलै ही शेवटची तारीख होती. गेल्यावर्षी ही मुदत १६ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली होती आणि ७ कोटी ३० लाखापेक्षा जास्त परतावे भरण्यात आले होते.

<><><><><>

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृती दिनी दरवर्षी दिला जाणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार यंदा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना आज प्रदान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज पुण्यात हा पुरस्कार देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे उपमुख्यमंत्री कार्यक्रमाला उपस्थित होते. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज जयंती आहे. त्यांनाही आदरांजली वाहण्यात येत आहे.

<><><><><>

व्हाईस ॲडमिरल ए एन प्रमोद यांनी आज नौदल उपप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. १ जुलै १९९० पासून भारतीय नौदलाच्या सेवेत असलेले ए एन प्रमोद यांना ३६ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. भारतीय नौदलात त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक नेतृत्व भूमिका सांभाळल्या असून ऑपरेशन सिंदूर मोहिमेचं नियोजन, सज्जता आणि इतर आघाड्यांवर त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

<><><><><>

रशियानं युक्रेनवर काल मध्यरात्री केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात १२ जण मारले गेले. या हल्ल्यामुळे काही इमारती कोसळल्यानं त्यांच्या ढिगाऱ्याखाली काही जण अडकले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. रशियानं दोन दिवसांपूर्वीच युक्रेनवर क्षेपणास्त्रं आणि ड्रोननं केलेल्या हल्ल्यातही १० नागरिकांचा मृत्यू झाला होता तर ५० जण जखमी झाले.

रशियाच्या वाढत्या क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी, अमेरिका आणि युक्रेनच्या मित्र राष्ट्रांना अतिरिक्त  हवाई संरक्षण कुमक पाठवण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><>**

आर्थिक संबंध विभागाचे सचिव सुधाकर दलेला यांनी बेनिन प्रजासत्ताकाच्या राष्ट्रीय दिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून सहभाग घेतला. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज सामजमाध्यमांवर ही माहिती दिली. जयस्वाल म्हणाले की, दलेला यांनी भारत आणि बेनिन यांच्यातले संबंध दृढ करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

**<><><><>**

तैपेई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची तन्वी शर्मा महिला एकेरीच्या अंतिम फेरीत दाखल झाली आहे. उपान्त्य सामन्यात तिने चिनी तैपेईच्या हुआंग यु सुनचा २१-१२, २१-११ असा पराभ केला. अंतिम सामन्यात तिची गाठ व्हिएतनामची थुय लिन एंगुयेन हिच्याशी पडेल.

**<><><><>**

राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धेत जूडोमध्ये प्रथमच भारताने सुवर्ण कामगिरी केली आहे. भारताच्या अस्मिता डे आणि हर्ष सिंग यांनी सुवर्ण पदकं पटकावली तर यामिनी मौर्यानं रौप्य पदक पटकावलं. तसंच भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रानं रौप्य पदक आणि यशवीर सिंगनं कास्य पदक पटकावलं. आतापर्यंत पाच सुवर्ण, बारा रौप्य आणि सहा कास्य पदकांची कमाई करून भारत २३ पदकांसह पदकतालिकेत १० व्या स्थानावर आहे.

राष्ट्रकुल स्पर्धांमधे यश मिळणाऱ्या खेळाडूंचं राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री तसंच इतर मान्यवरांनी अभिनंदन केलं आहे.

**<><><><>**

केरळमध्ये पावसाची संततधार सुरु असून हवामान विभागानं राज्यातल्या १४ जिल्ह्यांना आज अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. राज्यात ठिकठिकाणी पाणी साचल्यानं जनजीवन विस्कळीत झालं असून शैक्षणिक संस्थांना आज सुट्टी देण्यात आली आहे. तर दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये समुद्रात गेलेल्या दोन नौका बुडाल्यानं चार मच्छीमार बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेण्याचं काम सुरु आहे.

**<><><><><>**

हवामान विभागानं आज गुजरात, केरळ आणि माहे इथं मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. दिल्ली, हरियाणा, चंडीगड, पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, कोकण, गोवा आणि ईशान्य भारताच्या काही भागांमध्ये उद्या जोरदार पावसाचा अंदाज आहे. पुढचे २ दिवस जम्मू-काश्मीर, आंध्र प्रदेश, कर्नाटक, झारखंड, मध्य प्रदेश, ओदिशा, तेलंगण, विदर्भ आणि अंदमान-निकोबार बेटांवर वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**